(९८८९)

**नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम २००० च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यातील नागरी संस्थांना तांत्रिक पर्याय उपलब्ध करुन देण्यासाठी स्थापन केलेल्या तांत्रिक समितीच्या अहवालानुसार अंमलबजावणी करण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : घकव्य २०११/प्र.क्र. २८८ /पापु २२**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२**
**दिनांक : ५ ऑक्टोबर, २०१२**

**वाचा :-**

(१) पर्यावरण व वन मंत्रालय, भारत सरकार दिनांक २५/९/२००० च्या अधिसूचनेन्वये प्रसिध्द करण्यात आलेला नागरी घन कचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम २०००
(२) शासन निर्णय, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, क्र. थकव्य-१०२३/प्र.क्र. ६७५/पापु-२२ दि. २६/८/२००३
(३) शासन निर्णय, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, क्र. थकव्य-१००१/प्र.क्र.५४६/पापु-२२ दि. ५/१/२००२
(४) महसूल व वन विभागाच्या शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२००२/ प्र.क्र. ६६३/ ज-१, दि. १/९/२००२
(५) नियोजन विभागाचा शासन निर्णय क्र. स्थाविका-२००४/ प्र.क्र. ४३/कार्या-१४४५, दि. २०/२/२००४
(६) नगर विकास विभागाच्या शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२००४/अनौ-२४/ प्र.क्र.६३/ ०४/नवि-२० दि.१४/५/२००४
(७) पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या शासन परिपत्रक क्र. घकव्य-१००४/ प्र.क्र.१५/पापु-२२, दि. १७.७.०४
(८) नगर विकास विभागाच्या शासन निर्णय, क्र. घकव्य/१००६/ प्र.क्र. ५३/ नवि-१६, दि. २६ ऑक्टोबर, २००६
(९) पर्यावरण विभागाचा दि. ३ मार्च,२००६ चा अध्यादेश.
(१०) शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक :घकव्य २००९/प्र.क्र.९१/पापु २१ दि.१६/५/२००९
(११) शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक :घकव्य २००९/प्र.क्र.२६३/पापु २१ दि.३०/९/२००९

21/11/12 on web site · p.o. (Envis) & email pls

**प्रस्तावना :**

घनकचरा व्यवस्थापन ही नागरी स्थानिक संस्थांची अत्यंत महत्वाची घटनात्मक जबाबदारी आहे. नागरी स्थानिक संस्थांकडून घनकचरा व्यवस्थापनाबाबत शास्त्रोक्त उपाययोजना होण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालयाने दिनांक २५ सप्टेंबर, २००० च्या अधिसूचनेनुसार नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम २००० विनिर्दिष्ट केलेले आहेत. या नियमांतर्गत नागरी स्थानिक संस्थांना कचरा निर्मितीच्या जागीच वेगवेगळा करून गोळा करणे, साठविणे, वाहतूक, प्रक्रिया करणे व उर्वरित कचऱ्याची शास्त्रशुध्द विल्हेवाट लावणे, आणि वैज्ञानिक भूमीभरण जागा स्थापित करण्याबाबत कालबध्द पध्दतीने उपाय योजना करणे बंधनकारक केलेले आहे .

२. नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम २००० मधील तरतूदींची अंमलबजावणी करणे हे नागरी संस्थांवर बंधनकारक असल्यामुळे नागरी संस्थांना घनकचरा व्यवस्थापनाबाबत तांत्रिक, व्यवस्थापकीय व आर्थिक सहाय्यासाठी राज्य शासनाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या संदर्भांकित शासन

निर्णयान्वये धोरणात्मक व अंमलबजावणीशी संबंधित विविध आदेश / मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समित्या स्थापन करणे, शहरातील कचरा उचलणाऱ्या श्रमजीवींच्या सहकारी संस्था स्थापन करुन कचरा उचलण्याची कामे देणे, घनकचऱ्याच्या विल्हेवाटीसाठी शासकीय जमीन महसुल मुक्त व सारामाफीने उपलब्ध करुन देणे, घनकचरा व्यवस्थापनाचा आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत घेण्यात येणाऱ्या अनुज्ञेय कामाच्या यादीत समावेश, ब आणि क वर्ग नगरपालिकांसाठी सामुदायीक भूमीभरण जागा विकसीत करणे, नगर विकास विभागाकडून १२ व्या वित्त आयोगांतर्गत घनकचरा व्यवस्थापनासाठी निधी उपलब्ध करुन देणे इ.चा समावेश आहे.

३. घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियमाच्या केंद्र शासन व राज्य शासन यांच्याकडून देण्यात आलेल्या कालबध्द कार्यक्रमाची अंमलबजावणी संपूर्णतः होण्यासाठी तसेच, घनकचरा व्यवस्थापनाच्या सर्वंकष व शास्त्रोक्त अंमलबजावणीसाठी प्रामुख्याने नागरी स्थानिक संस्थांची उपक्रमशिलता, प्रशासकीय व व्यवस्थापकीय बाबींमध्ये पर्याप्त सहभाग, घनकचऱ्याच्या प्रक्रियेमधील तांत्रिक विकल्पांबाबत पूर्ण माहिती, नागरिक व सेवाभावी संस्थांचा पुरेसा सहभाग उपलब्ध करुन घेणे इ.बाबी आवश्यक आहेत. या बाबींचा विचार करुन घनकचरा व्यवस्थापना संदर्भात विविध तांत्रिक पर्याय उपलब्ध करुन देण्यासाठी राज्य शासनाद्वारे संदर्भांकित दिनांक १६ मे, २००९ च्या शासन निर्णयान्वये तांत्रिक समिती स्थापन करण्यात आली. तसेच, मा. उच्च न्यायालयापुढे दाखल करण्यात आलेल्या व नगर विकास विभागाकडून हाताळण्यात येणाऱ्या याचिका क्रमांक ९८/२००५ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये या तांत्रिक समितीद्वारे राज्यातील घनकचरा व्यवस्थापनाचा सर्वंकष अभ्यास करुन घनकचऱ्याचे वर्गीकरण, घराघरातून कचरा गोळा करणे, वाहतूक करणे, कचऱ्यावर प्रक्रिया करणे, शास्त्रोक्त कचरा भूमिभरण करणे, कचऱ्याची निर्मिती कमी करण्याबाबत उपाय योजना करणे, शिक्षण-प्रचार-जनजागृती व घनकचरा व्यवस्थापन नियमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कायदेशीर व नियामक उपाययोजना इ.बाबतीत **या तांत्रिक समितीने सखोल अभ्यास करुन शासनास सादर केलेल्या अहवालातील शिफारशींची अंमलबजावणी नागरी संस्थांमधून होण्यासाठी** शासन स्तरावरून निदेश देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

घनकचरा व्यवस्थापनाबाबत विविध तांत्रिक पर्याय उपलब्ध करुन देण्यासाठी संदर्भांकित दिनांक १६ मे, २००९ च्या शासन निर्णयान्वये गठीत केलेल्या तांत्रिक समितीच्या अहवालानुसार घनकचरा व्यवस्थापनासंदर्भात नागरी स्थानिक संस्थांनी कार्यवाही करुन घनकचरा व्यवस्थापनासाठी शास्त्रोक्त अंमलबजावणी करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. घनकचरा व्यवस्थापनासाठी स्थापन केलेल्या या तांत्रिक समितीने घनकचरा व्यवस्थापनासंदर्भात विविध शिफारशी केलेल्या आहेत. तांत्रिक समितीने घनकचरा प्रक्रिया, भूमिभरणासाठी जागेची निवड, कचऱ्याची कमी निर्मिती, स्वच्छतेसाठी उपविधी करणे, कचरा उचलणे व वाहतूक, घनकचऱ्यावर प्रक्रिया, शास्त्रोक्त पध्दतीने भूमिभरण जागा विकसित करणे, जनजागृती व क्षमता बांधणी, सार्वजनिक-खाजगी सहभाग व आर्थिक व्यवस्थापन या संदर्भात केलेल्या शिफारशींनुसार नागरी संस्थांनी कार्यवाही करावी. घनकचरा व्यवस्थापनासंदर्भात तांत्रिक समितीने केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने नागरी स्थानिक संस्थांनी

करावयाची कार्यवाही या शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्ट-१ ते परिशिष्ट-११ मध्ये नमूद केलेली असून नागरी संस्थांनी त्यानुसार खालील मुद्द्यांनुसार कार्यवाही करावी :-

(अ) **घनकचरा प्रक्रिया व भूमिभरणासाठी जागेची निवड** करण्यासंदर्भात तांत्रिक समितीने केलेल्या शिफारशीसंदर्भात नागरी स्थानिक संस्थांनी **परिशिष्ट - १** अनुसार कार्यवाही करावी.

(ब) **घनकचऱ्याची कमी निर्मिती करणे** (Waste Minimization), ज्याद्वारे कचऱ्याची वाहतूक, साठवणूक, प्रक्रिया व भूमिभरण यावर कमी खर्च होईल, यावर विशेष उपाययोजना करण्यासाठी नागरी स्थानिक संस्थांनी **परिशिष्ट - २** प्रमाणे कार्यवाही करावी.

(क) **शहराच्या स्वच्छतेसाठी नियम व उपविधी तयार करुन याबाबत कार्यक्षम नियमन करण्याबाबत** तांत्रिक समितीने केलेल्या शिफारशीनुसार नागरी स्थानिक संस्थांनी **परिशिष्ट - ३** नुसार कार्यवाही करावी.

(ड) **घनकचऱ्याचे दैनंदिन वेळेत उचल व वाहतूक होणे** हे शहराच्या स्वच्छतेसाठी अत्यंत आवश्यक असल्याने तांत्रिक समितीने केलेल्या शिफारशीनुसार नागरी संस्थांनी **परिशिष्ट - ४** नुसार कार्यवाही करावी.

(इ) घनकचरा व्यवस्थापनांतर्गत **घनकचऱ्यावर प्रक्रिया** करण्याकरिता तांत्रिक समितीने सुचविलेल्या विस्तृत उपाययोजनांची अंमलबजावणी **परिशिष्ट - ५** प्रमाणे करावी.

(ई) घनकचरा प्रक्रिया आणि भूमिभरणासाठी जागा निश्चित झाल्यानंतर **कचरा भूमिभरण जागा शास्त्रोक्त पध्दतीने विकसित करणे** आवश्यक आहे. घनकचऱ्याची दैनंदिन पध्दतीने विल्हेवाट व व्यवस्थापन करण्यासाठी या तांत्रिक समितीने व्यापक शिफारशी केलेल्या आहेत. त्यांची अंमलबजावणी नागरी स्थानिक संस्थांनी **परिशिष्ट - ६** प्रमाणे करावी.

(प) घनकचरा व्यवस्थापनासाठी नागरी स्थानिक संस्था, नागरिक व सेवाभावी संस्था इ.चा सहभाग अत्यंत आवश्यक असून त्यासाठी **जनजागृती करणे व क्षमता वाढविण्यासंदर्भात** तांत्रिक समितीने केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने नागरी स्थानिक संस्थांनी **परिशिष्ट - ७** प्रमाणे उपाययोजना कराव्यात.

(फ) घनकचरा व्यवस्थापनाच्या **कार्यक्षम अंमलबजावणीसाठी कायदेशीर व प्रशासकीय उपाययोजना** करण्याबाबत तांत्रिक समितीने शिफारशी केलेल्या आहेत. त्यासंदर्भात नागरी स्थानिक संस्थांनी **परिशिष्ट - ८** नुसार कार्यवाही करावी.

(ब) घनकचरा व्यवस्थापन कामाच्या **संनियंत्रण व पर्यवेक्षणासाठी** नागरी स्थानिक संस्थांनी **परिशिष्ट - ९** प्रमाणे कार्यवाही करावी.

(भ) घनकचरा व्यवस्थापनामध्ये **सार्वजनिक- खाजगी संस्थांच्या सहभागाबाबत** (PPP) तांत्रिक समितीने केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने नागरी स्थानिक संस्थांनी **परिशिष्ट - १०** नुसार कार्यवाही करावी.

(न) घनकचरा व्यवस्थापनासाठी नागरी संस्थांनी करावयाच्या **कार्यक्षम आर्थिक व्यवस्थापनाबाबत** नागरी स्थानिक संस्थांनी **परिशिष्ट - ११** नुसार कार्यवाही करावी.

३. घनकचरा व्यवस्थापनाबाबत विविध तांत्रिक पर्याय उपलब्ध करुन देण्यासाठी दिनांक १६ मे, २००९ च्या शासन निर्णयान्वये गठीत केलेल्या तांत्रिक समितीच्या अहवालात घनकचरा व्यवस्थापनासंदर्भात तांत्रिक बाबी शिवाय आर्थिक, प्रशासकीय, व्यवस्थापकीय, सामुदायिक सहभाग, क्षमता बांधणी, संनियंत्रण,

नियमन, इत्यादी अनेक महत्वाच्या विषयाबाबत विस्तृत शिफारशी केलेल्या आहेत. तांत्रिक समितीच्या शिफारशीच्या आधारे या शासन निर्णयान्वये नमूद केलेल्या उपाययोजनांनुसार नागरी स्थानिक संस्थांनी घनकचरा व्यवस्थापनासंदर्भात कार्यक्षम व कालबध्द पध्दतीने कार्यवाही करावी. त्यानुसार केलेल्या कामाचा अहवाल नागरी स्थानिक संस्थांनी संबंधीत जिल्हाधिकारी यांच्यामार्फत आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांना सादर करावा. नागरी स्थानिक संस्थांकडून प्राप्त झालेले अहवाल आयुक्त तथा संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय यांनी एकत्रितपणे प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग आणि प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांना सादर करावेत.

५. सदर शासन निर्णय हा महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक **संकेतांक २०१२१००५१६४९४२०२२८ असा आहे.**

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

**( दु. र. चंद्रिकापुरे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव.
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.मंत्री ( पाणी पुरवठा व स्वच्छता ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.राज्यमंत्री ( पाणी पुरवठा व स्वच्छता ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. महापौर,सर्व महानगरपालिका
६. महालेखापाल-१ मुंबई
७. महालेखापाल-२ नागपूर
८. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
९. प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. प्रधान सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. विभागीय आयुक्त ( सर्व ) महसूली विभाग
१३. सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई.
१४. संचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, पुणे.
१५. आयुक्त तथा संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, मुंबई
१६. जिल्हाधिकारी ( सर्व )
१७. आयुक्त, सर्व महानगरपालिका
१८. अध्यक्ष/ मुख्याधिकारी, सर्व नगरपरिषदा.
१९. संचालक, पर्यावरण, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई.
२०. श्री. एस.के.चावला, मा.सर्वोच्च न्यायालयाने नेमलेल्या समितीचे सदस्य, नवी दिल्ली.
२१. संचालक, वेस्टर्न झोन व वरिष्ठ वैज्ञानिक, निरी, वरळी, मुंबई १८.
२२. श्रीमती. ज्योती म्हापसेकर, अध्यक्ष, स्त्री मुक्ती संघटना, दादर, मुंबई १४.

२३. संचालिका, आखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई.

२४.श्री. एम.आर.शाह, प्रमुख सल्लागार, मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण, घनकचरा व्यवस्थापन कक्ष, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई ५१.

२५. श्री. ए.एम.गौर, सल्लागार, आखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, बांद्रा (पूर्व), मुंबई ५१.

२६. डॉ.एस.पी.काळे, न्युक्लीअर ॲग्रीकल्चर ॲंड बायोटेक्नॉलॉजिकल डिव्हीजन, ट्रॉम्बे, मुंबई ८५.

२७.श्री. अशोक शेकदर, घनकचरा व्यवस्थापन तज्ञ, नागपूर.

२८.श्री. अजित सराफ, विभागीय अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ.

२९. सदस्य सचिव (वित्त व प्रशासन), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,मुंबई

३०. सदस्य सचिव (तांत्रिक), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,मुंबई

३१. संचालक, लेखाकोषागार, मुंबई.

३२. निवासी उपजिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हास्तरीय समिती (सर्व)

३३. उप आयुक्त, नगरपालिका प्रशासन कक्ष, विभागीय आयुक्त ( सर्व ) महसूली विभाग

३४.वित्त विभाग (व्यय-३, अर्थसंकल्प-१८), मंत्रालय, मुंबई.

३५. सह सचिव / उप सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय.

३६. सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.

३७.निवडनस्ती (पापु-२२)

**परिशिष्ट - १**

**घनकचरा प्रक्रिया व भूमिभरणासाठी जागेची निवड** करण्यासंदर्भात केलेल्या शिफारशीसंदर्भात नागरी स्थानिक संस्थांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी :-

१) घनकचरा प्रक्रिया आणि शास्त्रोक्त भूमिभरणासाठी पर्याप्त जागा प्रत्येक नागरी स्थानिक संस्थेने उपलब्ध करुन घ्यावी. यासाठी संदर्भांकित दिनांक २६ ऑगस्ट,२००३ च्या शासन निर्णयान्वये घेतलेल्या धोरणात्मक निर्णयानुसार संबंधित जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समितीकडे जागा प्राप्त करणे व मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करावा.

२) घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी जागा निवडताना त्या जागेबाबत भविष्यात वाद-विवाद होऊ नयेत, यासाठी स्थानिक स्तरावर नागरिकांबरोबर विचारविनिमय (Public Consultation) करुन जागेची निवड नागरी स्थानिक संस्थांनी करावी.

३) घनकचरा प्रक्रिया व भूमिभरणासाठी जागेची निवड करताना ही जागा रहिवासी परिसर, विमानतळ, जंगल, पाण्याचे स्त्रोत, ऐतिहासिक, धार्मिक व सांस्कृतिक स्थळ, इ.पासून पर्याप्त अंतरावर असावे.

४) संबंधित सक्षम यंत्रणेकडून ना हरकत प्रमाणपत्र व परवानगी प्राप्त करून घनकचरा व्यवस्थापनासाठी जागेची निश्चिती झाल्यानंतर नागरी स्थानिक संस्थांनी या जागेचे विकास आराखड्यामध्ये आरक्षण करावे.

५) घनकचरा व्यवस्थापनासाठी आरक्षित केलेल्या जागेचे आरक्षण नागरी स्थानिक संस्थांनी परस्पर बदलू नये. परंतु अत्यंत महत्वाच्या कारणास्तव सदर आरक्षण बदलण्याची आवश्यकता असल्यास विहित पध्दतीने राज्य शासनाची मान्यता घेऊन सदर आरक्षण बदलता येईल. यासाठी पर्यायी जागा नागरी स्थानिक संस्थेने उपलब्ध करुन घेणे आवश्यक राहील.

६) नागरी संस्थेने घनकचरा प्रक्रिया व भूमिभरणासाठी जागेची निवड करताना ती पुढील २५ ते ३० वर्षाची क्षमता असेल, अशीच जागा निवडावी.

७) नागरी संस्थांनी कोणत्याही परिस्थितीत घनकचऱ्यावर प्रक्रिया करुन उर्वरित प्रक्रिया न करता येणारा उर्वरित कचरा विर्निदिष्ट भूमिभरण जागेमध्येच टाकावा. घनकचरा उघड्यावर टाकला जाणार नाही, याची दक्षता घ्यावी.

**परिशिष्ट - २**

सदरहू तांत्रिक समितीने **घनकचऱ्याची कमी निर्मिती करणे** (Waste Minimization), ज्याद्वारे कचऱ्याची वाहतूक, साठवणूक, प्रक्रिया व भूमिभरणासाठी कमी खर्च होईल, यावर विशेष उपाययोजना करण्याची शिफारस केलेली आहे. त्यासंदर्भात नागरी संस्थांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी :-

१) नागरी संस्थांनी घनकचऱ्याची कमी निर्मिती व्हावी यासाठी नागरिकांना प्रोत्साहीत करून जनजागृती करावी. यासाठी नागरी स्थानिक संस्थांनी घनकचरा व्यवस्थापन शुल्क हे कचरा निर्मितीच्या एकूण प्रमाण व कचऱ्याच्या प्रकारानुसार आकारण्यात यावे.

२) घनकचऱ्यावर विकेंद्रित पध्दतीने प्रक्रिया करून सुध्दा कचऱ्याची कमी निर्मिती करणे शक्य आहे. त्या दृष्टीने नागरी संस्थांनी मोठ्या प्रमाणावर घनकचरा निर्माण करणारे उदा. गृहनिर्माण संस्था, संकुले, व्यावसायिक संस्था यांना घनकचऱ्याचे व्यवस्थापन निर्मितीच्याच ठिकाणी किंवा त्यांच्या परिसरात करण्याबाबत प्रोत्साहित/उद्युक्त करावे. घनकचऱ्याच्या वर्गीकरणासाठी सेवाभावी संस्था व महिला मंडळे / बचतगट यांचीसुध्दा मदत घेण्यात यावी. घनकचरा गोळा करणे, वाहतूक करणे इत्यादी कामे कंत्राटदारावर सोपविण्यात आली असल्यास त्यांच्या कामावर नियमितपणे संनियंत्रण व देखरेख ठेवणे आवश्यक आहे. यामध्ये घनकचऱ्यावर प्रक्रिया करता येण्यासारख्या सेंद्रिय कचऱ्याची निर्मितीच्याच ठिकाणी विल्हेवाट लावण्याचा प्रयत्न करावा.

३) नागरी संस्थांनी शहरातील सर्व रस्ते स्वच्छ होतील याबाबत दक्षता घ्यावी. शिवाय सर्व गटारे, नाले, क्रिडांगणे, बगीचे, खुल्या जागा यांचीसुध्दा न चुकता स्वच्छता नियमितपणे करावी. या सर्व स्वच्छतेसाठी पर्याप्त कर्मचारी वर्ग उपलब्ध नसल्यास ही कामे खाजगी संस्थेद्वारे केल्यास अतिरिक्त कर्मचा-यावरील होणारा नियमित खर्च टाळता येईल. वरील सर्व स्वच्छतेसाठी आधुनिक सयंत्राचासुध्दा वापर नागरी संस्थानी करावा.

४) रस्त्यावर कचरा टाकण्याची प्रवृत्ती कमी करण्यासाठी नागरिकांमध्ये जनजागृती करण्याबरोबरच नागरी संस्थांनी यासाठी उपविधी करुन दंडात्मक उपाययोजना करावी. याशिवाय, रस्त्याची स्वच्छता व निटनेटकेपणा अबाधित ठेवण्यासाठी शहरातील विविध रस्त्याच्या कडेला चांगल्या गुणवत्तेच्या आंतरराष्ट्रीय मानकाच्या कचराकुंड्या ठेवण्यात याव्यात. त्यामध्ये सेंद्रिय व असेंद्रिय कचऱ्यासाठी स्वतंत्र कचराकुंडी ठेवण्यात यावी.

५) घनकचऱ्याचे वर्गीकरण, कचरा घराघरातून गोळा करणे, वाहतूक करणे इ. प्रक्रिया करता येण्यासाठी या प्रक्रियेमध्ये कचरा उचलणाऱ्या श्रमजिवीकांना (रॅगपिकर्स) सहभागी करुन घ्यावे. घनकचरा व्यवस्थापनात कचरा उचलणाऱ्या सर्व श्रमजिवीकांना (रॅगपिकर्स) नागरी स्थानिक संस्थांनी छायाचित्र असलेले ओळखपत्र तसेच गणवेश द्यावे. या श्रमजिवींकांना घनकचऱ्याचे वर्गीकरण व साठवणूक करण्यासाठी नागरी संस्थांनी, गृहनिर्माण संस्था व इतर संस्थांनी पर्याप्त जागा उपलब्ध करुन देण्यासाठी मदत करावी.

६) घनकचरा व्यवस्थापनामध्ये कचऱ्याची निर्मिती कमी व्हावी या उद्देशाने जनजागृती व नागरिकांची क्षमता बांधणी करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यादृष्टीने नागरी स्थानिक संस्थेने घनकचऱ्याचे दैनंदिन वर्गीकरण व पुर्नवापर करण्यासाठी नागरीकांना व सहकारी गृहनिर्माण संस्थांना प्रोत्साहन द्यावे.

**शासन निर्णय क्रमांक : घकव्य २०११/प्र.क्र. २८८ /पापु २२ दिनांक ५ ऑक्टोबर, २०१२ चे सहपत्र**

**परिशिष्ट - ३**

शहराची स्वच्छता व सुंदरता ही रस्त्यांच्या व सार्वजनिक ठिकाणांच्या स्वच्छतेवर अवलंबून असते. परंतु पर्याप्त मनुष्यबळ, यंत्रणा व क्षमता असूनही शहरातील रस्ते व सार्वजनिक स्थळे ही पुरेशी स्वच्छ व निटनेटकी नसतात, असे दिसून येते. यासाठी नागरी स्थानिक संस्थांनी जनजागृती करुन **शहराच्या स्वच्छतेसाठी नियम व उपविधी तयार करुन याबाबत कार्यक्षम नियमन करणे** आवश्यक आहे. त्या अनुषंगाने, या तांत्रिक समितीने केलेल्या शिफारशीनुसार नागरी स्थानिक संस्थांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी :-

१) शहरात दैनंदिन/नियमित स्वच्छता ही मोहीम / अभियान तत्वावर राबविण्यासाठी नागरी स्थानिक संस्थांनी स्थानिक क्षेत्र समिती/विशेष समित्या स्थापन कराव्यात.

२) घनकचरा व्यवस्थापन व स्वच्छतेशी संबंधित सर्व वाहनांवर जीआयएस बेस्ड ट्रेकिंग सिस्टिम स्थापित करावी.

३) नागरी स्थानिक संस्थांनी कचरा उघड्यावर टाकणे व घनकचऱ्याची मानवी हाताळणी यावर प्रतिबंध करावा.

४) घनकचऱ्याचे वर्गीकरण आणि घराघरातून कचरा गोळा केल्यानंतर सदर कचऱ्याची साठवणूक न करता नागरी संस्थांनी हा कचरा थेट घनकचरा प्रक्रिया केंद्र वा घनकचरा भूमिभरण येथे वाहून न्यावा.

५) कचऱ्याचे ढीग (Debris), बांधकाम कचरा (Construction Work) व मोठया प्रमाणावर कचरा निर्माण करणाऱ्या संस्था / व्यक्तींना त्यांच्या मागणीनुसार नागरी संस्थांनी हा कचरा वाहून नेण्यासाठी कालबध्द वेळापत्रक तयार करून वाहने उपलब्ध करून द्यावीत व यासाठी त्यांच्याकडून शुल्क सुध्दा आकारण्यात यावे.

**शासन निर्णय क्रमांक : घकव्य २०११/प्र.क्र. २८८ /पापु २२ दिनांक ५ ऑक्टोबर, २०१२ चे सहपत्र**

**परिशिष्ट - ४**

**घनकचऱ्याचे दैनंदिन वेळेत उचल व वाहतूक होणे** हे शहराच्या स्वच्छतेसाठी अत्यंत आवश्यक आहे. त्या दृष्टीकोनातून तांत्रिक समितीने केलेल्या शिफारशीनुसार नागरी संस्थांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी :-

१) कचरा उचलून थेट वाहून नेण्यासाठी वाहनांचा व आधुनिक पध्दतीच्या बिन्सचा उपयोग करावा. नागरी संस्थांकडे पर्याप्त वाहन नसल्यास खाजगी संस्थांकडून योग्य करारनामा करुन अशी वाहने उपलब्ध करुन घ्यावीत.

२) मोठया शहरामध्ये खूप अंतरावर घनकचरा प्रक्रिया केंद्र / भूमिभरण असलेल्या ठिकाणी नागरी संस्थांनी वहन तळ (Transfer Station) स्थापित करावीत, ज्याद्वारे वाहतूकीवरील खर्च कमी करता येईल.

३) शहरात निर्माण होणारा विविध प्रकारचा घनकचरा वाहून नेण्यासाठी नागरी संस्थेने स्वतंत्र वाहतूक व्यवस्था करणे आवश्यक आहे. ठोक घनकचरा निर्माते, हॉटेल्स, बाजारपेठ, बांधकाम कचरा इत्यादीसाठी स्वतंत्र वाहतूक व्यवस्था असावी. यासाठी खाजगी संस्थांना नेमून कचरा निर्माण करणाऱ्यांकडून शुल्क घेण्यास परवानगी देण्यात यावी.

**शासन निर्णय क्रमांक : घकव्य २०११/प्र.क्र. २८८ /पापु २२ दिनांक ५ ऑक्टोबर, २०१२ चे सहपत्र**

## परिशिष्ट - ५

घनकचरा व्यवस्थापनांतर्गत **घनकचऱ्यावर प्रक्रिया** करणे ही खर्चिक बाब आहे. तथापि, प्रत्येक नागरी संस्थांना त्यांच्याकडे पर्याप्त कचरा प्रक्रिया तंत्रज्ञान स्विकारणे शक्य होत नाही व त्यासाठी नागरी संस्थांकडे पर्याप्त निधी देखील उपलब्ध नाही, या सबबीखाली घन कचऱ्यावर प्रक्रिया न करणे हे स्विकाहार्य नाही. या दृष्टीकोनातून तांत्रिक समितीने ज्या शिफारशी केलेल्या आहेत, त्या अनुषंगाने नागरी संस्थांनी खालीलप्रमाणे उपाययोजना कराव्यात :-

१) नैसर्गिकदृष्ट्या कचऱ्याचे डी-कंपोझिशन हे ग्लोबल वॉर्मिंगसाठी कारणीभूत ठरत असल्यामुळे नागरी स्थानिक संस्थांनी सर्व प्रथम सेंद्रिय घनकचऱ्यावर प्रक्रिया करणे आवश्यक राहील. नागरी संस्थांनी एका निश्चित घनकचरा प्रक्रिया तंत्रज्ञानावर विसंबून न राहता शाश्वत अशा तंत्रज्ञानाचा अवलंब करुन घनकचऱ्यावर विकेंद्रित पध्दतीने प्रक्रिया करण्याचे उद्दिष्ट ठेवावे.

२) नागरी स्थानिक संस्थांनी सेंद्रिय कचऱ्यावर बायोमिथेनायझेशन प्रक्रियेद्वारे बायोगॅस तयार करुन त्याचा इंधन म्हणून, तसेच, विद्युत दिव्यांसाठी उपयोग करावा. असे प्रकल्प खाजगी संस्थांच्या सहभागातून (BOOT) घेण्यात यावेत. परंतू खाजगी सहभागातून असे प्रकल्प घेणे शक्य झाले नाही तर नागरी संस्थेने हे प्रकल्प स्थापित करुन या प्रकल्पाची देखभाल व दुरुस्ती सेवाभावी संस्था , बचतगट किंवा खाजगी संस्थांना देता येईल. परंतु या प्रकल्पाने तयार होणारा बायोगॅस निश्चितपणे वापरला जाईल याची दक्षता घ्यावी.

३) नागरी संस्थेने खाजगी संस्थेच्या सहभागाने घनकचरा प्रक्रिया प्रकल्प घेताना आवश्यक त्या सर्व कायदेशीर परवानगी / ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावेत. नागरी संस्थेने घनकचरा प्रक्रियेसाठी खाजगी संस्थाचा सहभाग घेतला असल्यास त्यांना टिपिंग शुल्क द्यावे, जे प्राधिकृत घनकचऱ्याच्या एकूण प्रमाणावर निर्धारित असावे. वर्गीकृत घनकचरा व मिश्र घनकचरा यासाठी वेगवेगळे टिपिंग शुल्क असावे, शिवाय वर्गीकृत कचरा उपलब्ध करुन दिल्यास नागरी संस्थेस खाजगी कंत्राटदाराने स्वामित्व शुल्क (Royalty) द्यावे.

४) घनकचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी खाजगी कंत्राटदाराने ज्वलनशिल / धोकादायक (Hazardous) व जैविक घनकचरा वगळून सर्व प्रकारचा कचरा नागरी संस्थांकडून स्विकारावा. जर कचरा स्विकारला नाही तर दंड करता यावा. यासाठी दंडाची तरतूद करारनाम्यात करावी.

५) घनकचऱ्यावर प्रक्रिया करुन निर्माण होणारे खत व त्यांच्या विक्रीबाबतचे अधिकार हे खाजगी कंत्राटदाराकडे असावेत. परंतु, यामधून नागरी संस्थांचे बगीचे इत्यादीसाठी लागणारे खत खाजगी कंत्राटदाराने विनाशुल्क द्यावेत.

६) क्योटो प्रोटोकॉलनुसार (Kyoto Protocol) कार्बन क्रेडिटद्वारे घनकचऱ्याच्या प्रक्रिया प्रकल्पासाठी अनुदान प्राप्त होऊ शकते. यासाठी नागरी संस्थांनी याअंतर्गत प्राप्त होणारे फायदे नागरी संस्थेस मिळतील याची तरतूद प्रकल्पाच्या करारनाम्यामध्ये करावी.

७) घनकचऱ्यावर कंपोस्टिंग प्रक्रिया ही अनेक बाबतीत फायदेशीर आहे. याद्वारे कृषीक्षेत्र आणि पर्यावरणामध्ये अनेक आकर्षक असे फायदे निदर्शनास आलेले आहेत. ज्यामध्ये, पाणी आणि जमिनीचे संवर्धन, भूजलाच्या गुणवत्तेचे संवर्धन, मिथेन गॅसच्या निर्मितीस प्रतिबंध आणि लिचेटची निर्मिती न होणे, रासायनिक खताची आवश्यकता कमी करणे, सेंद्रिय खत मिळत असल्याने शेतमालाची उत्पादनशीलता वाढते, इत्यादीचा समावेश आहे.

८) घनकचऱ्यापासून गांडूळ खत निर्मिती करणे हा सुध्दा एक कमी खर्चाचा विकल्प उपलब्ध आहे.

९) इंसिरिनेशन ही उच्च तापमानात कचरा नियंत्रित पध्दतीने जाळण्याचे तंत्रज्ञान असून सर्वच कचरा या प्रक्रियेद्वारे जाळता येत नसून एकूण घनकचऱ्याच्या ५०% कचरा हा ज्वलनशिल असतो. ज्या शहरामध्ये जागेची उपलब्धता कमी आहे अशा ठिकाणी इंसरिनेशन ही पध्दत उपयोगी ठरते.

१०) नागरी संस्थांनी घनकचरा व्यवस्थापनासाठी विविध उपलब्ध तंत्रज्ञानाची तपासणी करुन सुयोग्य तंत्रज्ञानाचा अवलंब करणे आवश्यक आहे. या सुयोग्य तंत्रज्ञानाची निवड करताना पुढील बाबींचा विचार करणे आवश्यक आहे. जसे, घनकचऱ्याची एकूण निर्मिती, मर्यादित भांडवली गुंतवणूक, प्रकल्पावरील मर्यादित विजेचा खर्च, मर्यादित प्रदुषण, घनकचऱ्यापासून निर्माण होणारे विविध उत्पादन, विकेंद्रित पध्दतीमुळे रोजगार निर्मिती इत्यादी.

११) नागरी संस्थांना घनकचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी विकेंद्रित व केंद्रित पध्दतीने तंत्रज्ञानाची निवड खालीलप्रमाणे करता येईल :-

**१) विकेंद्रित पध्दतीचे तंत्रज्ञान.**

अ) एरोबिक प्रक्रियेद्वारे कंपोस्ट करणे - प्रतिदिन ५ टन पर्यंतच्या घनकचऱ्यासाठी.

ब) बायोमॅकेनिकल प्रक्रिया - प्रतिदिन ५ टन पर्यंतच्या घनकचऱ्यासाठी.

२) केंद्रित पध्दतीचे तंत्रज्ञान.

अ) मायक्रोब्सच्या सहाय्याने कंपोस्टिंग - प्रतिदिन २०० ते ५०० टन पर्यंतच्या घनकचऱ्यासाठी.

ब) बायो मिथेनायझेशन - प्रतिदिन ५० टन पर्यंतच्या घनकचऱ्यासाठी.

क) आरडीएफ - पॅलेटायझेशन. प्रतिदिन २०० ते ५०० टन पर्यंतच्या घनकचऱ्यासाठी.

ड) आरडीएफच्या सहाय्याने कच-यापासून विजनिर्मिती - प्रतिदिन ५०० टन पर्यंतच्या घनकचऱ्यासाठी.

इ) बायोसेल रियॉक्टर किंवा बायो रियॉक्टर लँडफिल - प्रतिदिन १००० टन पर्यंतच्या घनकचऱ्यासाठी.

१२) त्याचबरोबर नागरी स्थानिक संस्थांनी सेंद्रिय घनकचऱ्यापासून खत तयार करावे, याद्वारे कचरा भूमिभरणामध्ये जाणाऱ्या (इनर्ट) कच-याचे प्रमाण कमी होईल.

१३) नागरी संस्थांनी प्रक्रिया न करता येणारा कचरा हा थेट भूमिभरण जागेमध्ये पाठवावा.

१४) कचऱ्याचे ढीग (Debris) व इतर कचरा हा बांधकामासाठी (Construction Work) लागणारा भराव म्हणूनही उपयोगात आणता येईल.

१५) खाजगी संस्थांच्या सहभागाने घनकचरा प्रक्रिया प्रकल्प घेताना नियमानुसार पारदर्शी पध्दतीने निविदा प्रक्रिया अवलंबविण्यात यावी. जेणेकरून घनकचरा प्रक्रियेची द्यावी लागणारी टिपींग फी ही स्पर्धात्मक रित्या निश्चित होईल.

## परिशिष्ट - ६

घनकचरा प्रक्रिया आणि भूमिभरणासाठी जागा निश्चित झाल्यानंतर **कचरा भूमिभरण जागा शास्त्रोक्त पध्दतीने विकसित करणे** आवश्यक आहे. त्यामध्ये कंपाऊंड, बफरझोनमध्ये वृक्षलागवड आणि सांडपाणी व्यवस्था इत्यादी सुविधा असावी. नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम २००० अंतर्गत व्यापक तरतूद असूनही बहुतांश नागरी संस्था या केवळ घनकचरा प्रक्रिया व्यवस्थेवर विशेष लक्ष देतात, तथापि, कचरा भूमिभरण जागा विकसित करण्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करतात. या प्रवृत्तीमुळे नागरी संस्था भूमिभरण जागा विकसित करण्यामध्ये विलंब करीत आहेत. त्याचा परिणाम म्हणजे कचऱ्यावर प्रक्रिया झाल्यानंतर शिल्लक कचरा (Inert) हा खुल्या जागांवर टाकण्यात येतो, ज्याद्वारे वायू, जल, प्रदूषण व नागरिकांचे आरोग्य व पर्यावरणाच्या प्रदूषणाचे प्रश्न निर्माण होत असतात. घनकचऱ्याची दैनंदिन पध्दतीने विल्हेवाट व व्यवस्थापन करण्यासाठी या तांत्रिक समितीने व्यापक शिफारशी केलेल्या आहेत. त्या दृष्टीकोनातून नागरी स्थानिक संस्थांनी खालीलप्रमाणे उपाययोजना कराव्या:-

१) नागरी स्थानिक संस्थांनी वैज्ञानिक पध्दतीने भूमिभरण जागेचे बांधकाम करण्यास प्राधान्य द्यावे.

२) वैज्ञानिक भूमिभरण जागेवरील भार कमी होण्यासाठी कचऱ्यावर पुर्नप्रक्रिया करण्यात यावी.

३) नागरी स्थानिक संस्थांनी कचरा भूमिभरण व्यवस्था स्वतंत्र पध्दतीने किंवा सामुदायिक पध्दतीने (कांही नागरी स्थानिक संस्था मिळून ) निर्माण करावी व व्यावसायिक पध्दतीने त्याचे व्यवस्थापन करावे.

४) घनकचरा प्रक्रिया केंद्र अथवा भूमिभरणासाठी प्रत्येक नागरी संस्थेस जागा मिळेलच असे नाही. शिवाय, वैज्ञानिक भूमिभरण जागा विकसित करणे छोट्या व मध्यम शहरांना तांत्रिक आणि आर्थिक दृष्ट्या परवडणारे नसल्याने सामुदायिक पध्दतीने (Regional Landfill Site) वैज्ञानिक भूमिभरण जागा निर्माण करण्यावर भर द्यावा. भूमिभरणासाठी प्रथम जागा निवडताना कमी उत्पादकता असलेल्या जमिनीची निवड करावी, यासाठी सॅटेलाईट इमेजचा सुध्दा वापर करण्यांत यावा. घनकचरा व्यवस्थापनाची सामुदायिक व्यवस्था (RLS) निर्माण करण्यासाठी नागरी संस्थांनी आर्थिक सहभाग द्यावा.

५) घनकचरा प्रक्रिया व भूमिभरण जागा स्थापन करण्यासाठी नागरी स्थानिक संस्थानी सार्वजनिक-खाजगी सहभाग (PPP) तत्वाचा अवलंब करावा. अशा प्रकारे खाजगी सहभाग घेताना नियमानुसार पारदर्शी निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी.

६) घनकचरा भूमिभरण जागेमध्ये विहित केलेल्या आवश्यक त्या सर्व पायाभूत सुविधा असणे आवश्यक आहे. विशेषत: लिचेट गोळा करणे व लिचेट विल्हेवाटीची व्यवस्था असावी, जेणेकरुन जल स्त्रोत / भूजलाचे प्रदुषण होणार नाही.

७) शहरामध्ये निर्माण होणारा घनकचरा व भविष्यात घनकचरा निर्मितीमध्ये होणारी वाढ या दृष्टीकोनातून नागरी संस्थांनी घनकचरा भूमिभरण जागा ही टप्प्याटप्प्याने विकसित करावी. पूर्ण उपलब्ध जागेमध्ये वैज्ञानिक भूमिभरण स्थापित करण्याऐवजी ३ वर्षासाठी जेवढी भूमिभरण लागणार तेवढीच जागा विकसित करण्यात यावी. ही जागा जशी घनकच-याने भरत जाईल तशी उर्वरित जागेतील पुढच्या टप्प्याचे भूमिभरणाचे काम घेण्यात यावे. शेवटी कचऱ्याने पूर्ण भरलेल्या भूमिभरण जागेवर माती टाकून त्यावर वृक्षारोपण करण्यात यावे.

**शासन निर्णय क्रमांक : घकव्य २०११/प्र.क्र. २८८ /पापु २२ दिनांक ५ ऑक्टोबर, २०१२ चे सहपत्र**

**परिशिष्ट - ७**

घनकचरा व्यवस्थापनासाठी नागरी स्थानिक संस्था, नागरिक व सेवाभावी संस्था इ.चा सहभाग अत्यंत आवश्यक असल्याने त्यांच्यामध्ये **जनजागृती निर्माण करणे व क्षमता वाढविणे** आवश्यक आहे. घनकचरा व्यवस्थापन हे नागरीकांचे आरोग्य, शहर स्वच्छता व पर्यावरणांशी संबंधित असल्याने घनकचरा व्यवस्थापनाच्या संदर्भात जनजागृतीशी संबंधित बाबींना नागरी संस्थांनी महत्त्व व प्राधान्य द्यावे. या दृष्टीकोनातून तांत्रिक समितीने केलेल्या शिफारशींनुसार नागरी संस्थांनी खालील उपाययोजना कराव्यात :-

१) नागरी संस्थांनी घनकचरा व्यवस्थापनातील विविध घटक ज्यामध्ये कचऱ्याचे वर्गीकरण, कचरा गोळा करणे, वाहतूक, साठवणूक, प्रक्रिया, भूमिभरण जागा, प्रशासकीय व व्यवस्थापकीय बाबी संदर्भात नागरिक, अभियंते / कर्मचारी यांचेमध्ये जनजागृती व क्षमता बांधणीसाठी विविध उपाययोजना हाती घ्याव्यात.

२) नागरी स्थानिक संस्थांनी त्यांच्या अधिनस्त अभियंते / अधिकारी /कर्मचाऱ्यांना घनकचरा व्यवस्थापना संबंधातील विशेष प्रशिक्षण उपलब्ध करुन द्यावे. त्याशिवाय, नागरी संस्थेकडील यंत्र सामुग्री, मनुष्यबळाचा पूर्ण उपयोग करून घनकचरा व्यवस्थापन कार्यक्षम, संनियंत्रित व सुरळीत होईल हे पहावे.

३) घनकचऱ्याच्या सर्वांगीण व्यवस्थापनासाठी नागरी स्थानिक संस्थांनी आर्थिक/व्यवस्थापकीय नियोजन करावे व त्यासाठी कालबध्द कार्यक्रम आखून त्याचे संनियंत्रण करण्यासाठी नागरी संस्थेअंतर्गत विशेष यंत्रणा स्थापित करावी.

४) राज्यातील महानगरपालिकांप्रमाणे इतर नागरी संस्थांनी शहर स्वच्छता आराखडे (City Sanitation Plan) तयार करावेत. या शहर स्वच्छता आराखडयाच्या अंमलबजावणीसाठी नागरी संस्थांनी विविध आर्थिक स्त्रोताचा वापर करुन शहर स्वच्छता आराखड्याच्या कार्यान्वयनाचा कृती कार्यक्रम तयार करावा.

## परिशिष्ट - ८

घनकचरा व्यवस्थापनाच्या **कार्यक्षम अंमलबजावणीसाठी कायदेशीर व प्रशासकीय** उपाययोजना करण्याच्या शिफारशी तांत्रिक समितीने केलेल्या आहेत. त्या अनुषंगाने नागरी संस्थांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१) घनकचरा व्यवस्थापनाबाबत नागरिकांमध्ये शिस्त आणण्यासाठी कचरा उघड्यावर टाकणाऱ्या व साठवणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यासाठी नागरी संस्थांनी उपविधी तयार करावेत. त्यासाठी या क्षेत्रातील तज्ञ, नागरीक व सेवाभावी संस्था यांच्याशी नागरी संस्थांनी चर्चा करून पुढील कार्यवाही करावी..

२) घनकचरा व्यवस्थापनामध्ये शिस्त व तत्परता आणण्यासाठी नागरी संस्थांनी अस्तित्वातील उपविधीमध्ये आवश्यक ते बदल करावेत.

३) घनकचरा निर्माण करणा-यांनी कच-याचे वर्गीकरण व साठवण त्यांच्या स्तरावर करणे बंधनकारक करावे.

४) घनकचरा व्यवस्थापनाअंतर्गत असलेल्या विविध घटकांमध्ये अशासकीय संस्था, सेवाभावी संस्था, बचत गट इत्यादींना अंतर्भूत करुन घनकच-याचे व्यवस्थापन करण्यात यावे. या संस्थांना घनकचरा व्यवस्थापनाची विविध कामे नियमानुसार निविदा प्रक्रियेद्वारे घेता येतील.

५) घनकचरा व्यवस्थापनाच्या कामावर पर्यवेक्षणासाठी ज्येष्ठ नागरिक, तज्ञ, सेवाभावी संस्था इत्यादीमधून स्थानिक क्षेत्र पर्यावरण समितीची (Local Area Environment Committee - LAEC) स्थापना करण्यात यावी.

६) शहरातील स्वच्छता व घनकचरा व्यवस्थापन इत्यादी बाबत करावयाच्या जनजागृती व क्षमता बांधणीच्या कामासाठी नागरी संस्थांनी उपलब्ध अधिका-यामधून काही अधिका-यांवर ही जबाबदारी सोपवावी.

७) घनकचरा व्यवस्थापनाच्या विविध घटकांबाबत नियमितपणे माहिती, तंत्रज्ञान, व्यवस्थापन कौशल्याचे आदानप्रदान होण्यासाठी अधिकारी / अभियंता / कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात यावे.

८) घनकचरा व्यवस्थापनामध्ये नागरी संस्थांनी केलेल्या चांगल्या कामांची माहिती **"Compendium of Best Practices in Municipal Waste Management"** यामध्ये अंतर्भूत केलेली असून याच्या आधारे आपल्या शहरांमध्ये उत्कृष्ट काम करण्याचा प्रयत्न नागरी संस्थांनी करावा. सदर माहितीपुस्तिका संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचे कार्यालयात उपलब्ध आहे.

**शासन निर्णय क्रमांक : घकव्य २०११/प्र.क्र. २८८ /पापु २२ दिनांक ५ ऑक्टोबर, २०१२ चे सहपत्र**

**परिशिष्ट - ९**

घनकचरा व्यवस्थापन कामाच्या **संनियंत्रण व पर्यवेक्षणासाठी** तांत्रिक समितीने शिफारशी केलेल्या आहेत. त्या अनुषंगाने नागरी संस्थांनी खालीलप्रमाणे उपाययोजना / कार्यवाही करण्यात यावी.

१) घनकचरा व्यवस्थापनासाठी नागरी संस्थांनी सर्वंकष अशी संनियंत्रण व पर्यवेक्षण व्यवस्था निर्माण करावी, ज्याद्वारे, घनकचरा व्यवस्थापनाच्या विविध घटकांची अंमलबजावणी व संनियंत्रण काटेकोरपणे होत आहे याची दक्षता घेता येईल.

२) महानगरपालिका आयुक्त / नगरपरिषद मुख्याधिकारी यांनी घनकचरा व्यवस्थापनासाठी माहिती व्यवस्थापन प्रणाली (MIS) स्थापित करुन त्यानुसार त्रैमासिक अहवाल नियमितपणे संबंधीत जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त, तसेच, आयुक्त तथा संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय यांना सादर करावा. आयुक्त तथा संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय यांनी नागरी संस्थाचा एकत्रित अहवाल प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग आणि प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांना सादर करावा.

३) संबंधीत जिल्हाधिकारी यांनी नगर परिषदांच्या मासिक बैठकीमध्ये या शासन निर्णयातील तरतूदीनुसार घनकचरा व्यवस्थापनाच्या कामाचा आढावा घेऊन अहवाल विभागीय आयुक्त आणि आयुक्त तथा संचालक, नगर परिषद संचालनालय यांना पाठवावा. विभागीय आयुक्त यांनी सुध्दा नागरी संस्थांच्या घनकचरा व्यवस्थापन कामाचा त्रैमासिक आढावा घ्यावा.

**शासन निर्णय क्रमांक : घकव्य २०११/प्र.क्र. १८८ /पापु २२ दिनांक ५ ऑक्टोबर, २०१२ चे सहपत्र**

## <u>परिशिष्ट - १०</u>

घनकचरा व्यवस्थापनामध्ये **सार्वजनिक-खाजगी संस्थांच्या सहभागाबाबत** (PPP) तांत्रिक समितीने शिफारशी केलेल्या आहेत. त्यानुसार, नागरी संस्थांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१) घनकचऱ्याचे ढिग (Debris), मोठे कचरा निर्माते, हॉटेल्स, बाजार इत्यादी ठिकाणी निर्माण होणारा घनकचरा उचलणे व वाहून नेणे इत्यादींमध्ये खाजगी संस्थांचा सहभाग घेण्यात यावा.

२) घराघरातून कचरा गोळा करणे, कचऱ्याचे वर्गीकरण करणे व वाहतूक इत्यादींमध्ये खाजगी संस्था, सेवाभावी संस्था, अशासकीय संस्था, श्रमजीवी इत्यादींना सहभागी करुन घ्यावे.

३) बायोगॅस, गांडूळ खत इत्यादी प्रकल्प खाजगी संस्थांना ***"बांधा-वापरा-हस्तांतरीत करा"*** या तत्वावर देता येतील.

४) घनकचऱ्यावर प्रक्रिया करणे, घनकचऱ्यापासून वीज / खत निर्मिती व भूमिभरण इत्यादी खाजगी संस्थांच्या सहभागाने करता येईल.

५) उपरोक्त घनकचरा व्यवस्थापनाच्या विविध कामांमध्ये वेगवेगळ्या खाजगी संस्थांना नियुक्त करण्याऐवजी नागरी संस्थांनी सर्व कामांसाठी सर्वंकष व कार्यानुरुप एकत्र कंत्राटसुध्दा देता येईल. याद्वारे, नागरी संस्थांचे प्रशासकीय दायित्वसुध्दा कमी होऊ शकेल.

६) घनकचरा व्यवस्थापनाच्या कामामध्ये खाजगी संस्थांचा आर्थिक सहभाग निश्चितपणे घेण्यात यावा. **परंतु खाजगी संस्थांचा सहभाग घेताना निविदा प्रक्रिया ही पारदर्शक व विहित नियमानुसार करण्याची दक्षता घेऊन ई-टेंडरींग (e-tendering) पध्दतीचा अवलंब करावा.**

## परिशिष्ट - ११

घनकचरा व्यवस्थापनासाठी नागरी संस्थांनी करावयाच्या आर्थिक व्यवस्थापनाबाबत तांत्रिक समितीने काही शिफारशी केलेल्या आहेत. त्यानुसार नागरी संस्थांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१) नागरी संस्थांनी घनकचरा व्यवस्थापनासाठी भांडवली आणि महसूली खर्चाचे अंदाज तयार करुन त्यांची अंदाजपत्रकात तरतूद करावी.

२) घनकचरा व्यवस्थापनाच्या सेवा पुरवण्यासाठी नागरी संस्थांनी नागरीकांकडून सेवाशुल्क वसूल करावे. त्याशिवाय, घनकचऱ्यापासून निर्माण होणा-या विविध उत्पादनामधून सुध्दा महसूल मिळविण्याचा प्रयत्न करावा.

३) नागरिकांकडून घनकचरा व्यवस्थापनासाठी सेवाशुल्क घेताना नागरिकांचे उत्पन्न व कचरा निर्मिती इत्यादी निकष असावेत. तसेच कचऱ्याचे वर्गीकरण करण्यास प्रोत्साहन म्हणून वर्गीकरण करणाऱ्यांना सेवाशुल्कामध्ये काही प्रमाणात सवलत द्यावी.

४) कचरा गोळा करणाऱ्या सेवाभावी संस्था व खाजगी संस्था यांना सुध्दा सेवाशुल्क नागरिकांकडून वसूल करण्याची मुभा देण्यात यावी.यासाठी नागरी संस्थांनी अशा संस्थांना प्राधिकृत करणे आवश्यक राहील.

५) घनकचऱ्याचे ढिग (Debris), व्यावसायिक आस्थापना, मोठे कचरा निर्माते इत्यादीकडून सेवाशुल्क घेण्यात यावे.

--------